उपचार

- पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे करण्यात आलेल्या संशोधनास अनुसरून उपचार पद्धती विकसित करण्यात आलेली आहे.
- पशुवैद्यकाकडून उरमोडी आजाराचा उपचार केल्यास आजारी म्हशी बऱ्या होतात परंतु आजार पूर्णपणे बरा होण्यास जवळपास ३० दिवसांचा कालावधी लागतो.



उरमोडी आजाराने ग्रस्त पाठीमध्ये बाक आलेली व रोड झालेली दुधाळ म्हैस (उपचारापूर्वी)



बरी झालेली उरमोडी बाधित दुधाळ म्हैस (उपचारानंतर)

- उरमोडी आजाराच्या उपचारासाठी खनिजक्षार मिश्रण ३० ग्राम प्रति १०० किलो वजन याप्रमाणे दिवसातून २ वेळा विभागून १ महिना दिल्यास जनावर पूर्णपणे बरे होते.
- रोगी गाई–म्हशींना सोडीयम ॲसीड फॉस्फेट रोज ३०–५० ग्रॅम याप्रमोण सलग एक महिना दिले तर जनावर बरे होत असल्याचे दिसून आले आहे.

प्रतिबंध

- हा आजार टाळण्यासाठी गाई–म्हशींच्या आहारात नियमितपणे खनिजक्षार मिश्रण (५० ग्राम) देण्यात यावे.
- दुधाच्या प्रमाणात खनिज मिश्रणे वाढवावीत.
- दुभत्या गायी–म्हशींना आहारात मुबलक प्रमाणात हिरवा चारा द्यावा.
- तसेच दुधाच्या प्रमाणात खुराक उपलब्ध करून द्यावा जेणेकरून उत्तम उत्पादकता असलेल्या गायी–म्हशी अशा आजारास बळी पडणार नाहीत. सर्वसाधारणपणे एक लिटर दुधासाठी ३००–४०० ग्राम ज्यादा खुराक द्यावा.

लेखक

प्रा. डॉ. अनिल भिकाने

संचालक, विस्तार शिक्षण

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

व

डॉ. रविंद्र जाधव

सहाय्यक प्राध्यापक

चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग,

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/४/२०२५

दुधाळ गायी–म्हशीमधील मृदू अस्थी (उरमोडी) आजार



प्रकाशक

विस्तार शिक्षण संचालनालय

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१

टोल फ्री क्रमांक – १८००–२३३–३२६८

संकेतस्थळ – www.mafsu.ac.in

प्रस्तावना

आपल्या राज्यात उरमोडी हा आजार दुभत्या प्रामुख्याने अधिक दुध देणाऱ्या म्हशींमध्ये आढळून येतो. गाभण म्हशीतही काही प्रमाणात दिसून येतो तसेच गायीमध्येही हा आजार दिसून येतो. शक्यतो दुष्काळी परिस्थिती किंवा उन्हाळ्याच्या दिवसांत जेव्हा हिरव्या चाऱ्याची कमतरता असते अशा काळात वाळलेला चारा, कडबा, सोयाबीन/ तुर गुळी अशा स्फुरदची कमतरता असणाऱ्या खाद्यावर गायी-म्हशींचा उदरनिर्वाह होतो. त्या कालावधीत हा आजार प्रामुख्याने दिसून येतो. आपल्या राज्यात मातीमध्ये स्फुरदचे प्रमाण कमी आहे. तसेच वाळलेल्या चाऱ्यामध्ये हे प्रमाण अगदी नगण्य असते. त्यामुळे दुधासाठी लागणारे स्फुरद जर आहारातून मिळाले नाही तर जनावरे ते हाडातून मिळवतात. त्यामुळे अशा जनावरांची हाडे ठिसूळ होतात व दिवसेंदिवस जनावर रोड होत जाते. या आजारामुळे बाधित म्हशींची दुग्धउत्पादकता कमी होते, प्रजनन क्षमता कमी होते तसेच आजाराच्या उपचारासाठी बराच खर्च येऊनही पूर्णपणे बरे होण्यासाठी खूप जास्त वेळ लागतो आणि त्यातून पशुपालकाला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

अशातच जर बाधित जनावरांनी अखाद्य वस्तू खाणे सुरु केले तर त्यांच्या पोटामध्ये कापड, प्लास्टिक किंवा तार-खिळे अशा वस्तू जाऊन पोटाचे आजारही (टी.आर.पी.) जडू शकतात. जास्त दुध देणाऱ्या म्हशींच्या दुधामध्ये जास्त स्फुरद स्रवले जाते आणि ही गरज आहारातून भरून न आल्यास गाई म्हशी मृदू अस्थी आजाराला बळी पडू शकतात. तसेच आहारामध्ये कॅल्शियम, ड जीवनसत्व आणि स्फुरदची कमतरता असल्यास दुधामधील म्हशींना या आजाराचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो.

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे उरमोडी रोगावर सखोल संशोधन झाले आहे त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

लक्षणे

- या आजारामध्ये बाधित म्हशींचे दुग्धउत्पादन घटते.
- प्रजननक्षमता कमी होते तसेच वजन कमी होवून जनावर खंगते.
- बऱ्याच बाधित म्हशींमध्ये अखाद्य वस्तू खाण्याची सवय जडते.
- बाधित म्हशींना बसताना व उठताना त्रास होतो त्यामुळे जनावर उठताना बराचवेळ पुढचे पाय दुमडून उभे राहते व नंतर हळुवारपणे उभे राहते.



उठताना बराचवेळ पुढचे पाय दुमडून उभी असलेली उरमोडी बाधित म्हैस

- अस्थीमधील वेदनांमुळे म्हशी हळुवारपणे किंवा आखडून चालतात किंवा काही प्रमाणात लंगडत चालतात.
- पाठीमध्ये बाक येतो आणि खाणेपिणे मंदावते.
- काही वेळा चालताना हाडांचा आवाज ऐकू येतो.
- बाधित म्हशी जास्त वेळ बसून राहतात तसेच एकदा बसल्यानंतर उठण्यास टाळाटाळ करतात.

निदान

- या आजारामध्ये बाधित म्हशींचा जास्त दुग्धउत्पादनाचा इतिहास, आहारात खुराक व हिरव्या चाऱ्याची कमतरता व पूर्णपणे वाळलेल्या चाऱ्यावर अवलंबून राहणे इत्यादी माहिती.
- रोड व अशक्त होत जाणे, पाठीमध्ये बाक येणे, आखडून चालणे, उठताना त्रास होणे व उठण्यासाठी जास्त विलंब होणे इत्यादी लक्षणे.
- रक्तातील स्फुरदचे प्रमाण अत्यंत कमी होणे, कॅल्शियमचे प्रमाण घटणे असे बदल दिसून येतात.
- क्ष-किरण तपासणी केली असता, बाधित म्हशींच्या हाडामधील घनता कमी झाल्याचे दिसून येते.
- म्हशींमधील अस्थी दुर्बलता/ उरमोडी (Osteomalacia) या रोगाचे निदान तसेच या आजाराची टी.आर.पी. पासून भिन्नता यांचा अंदाज पुढील लक्षणावरून करता येतो. शरीराचे सामान्य तापमान, शरीरात वाढत जाणारा ताठरपणा, पाठीमध्ये बाक, उभे राहताना दीर्घकाळ गुढघ्यावर टेकून उभे राहण्याची क्रिया इत्यादी.
- या रोगाचे खात्रीलायक निदान क्ष-किरण तपासणीद्वारे केले जाऊ शकते.